# प्रकरण – 13

## अर्थसहाय्य कार्यक्रमांच्या अंमलबजावणीची पध्दत, वाटप केलेल्या रक्कमा आणि या कार्यक्रमांचे लाभार्थी यांचा तपशिल

# प्रकरण – 13

## अर्थसहाय्य कार्यक्रमांच्या अंमलबजावणीची पध्दत, वाटप केलेल्या रक्कमा आणि या कार्यक्रमांचे लाभार्थी यांचा तपशिल

## अनुदान/शासकीय सहाय्य क्रियान्वित करण्याची पध्दती:

1. मध्यवर्ती खरेदी खात्यातर्फे महिलांसाठी कल्याणकारी स्वतंत्र अशी योजना राबविण्यांत येत नाही. परंतु शासन निर्णय क्र.संकीर्ण-1095/प्र.क्र.158/का.2 नुसार, महानगरपालिकेच्या मध्यवर्ती खरेदी खात्यामार्फत विविध खात्यांना विविध वस्तूंचा पुरवठा करण्यासाठी मागविण्यांत येणा-या निंविदेत खालील वस्तूंचा पुरवठा करण्यासाठी महिला संस्थांकरिता एकूण अनुसूचित परिमाणाच्या 50% अनुसूचित परिणाम आरक्षित केलेले आहे. महिला संस्था खालील सदर बाबींसाठी निविदा भरु शकतात.

   1) सोपबार, कार्बोलिक सोप, टॉयलेट सोप
   2) जंतुनाशक द्रव काळे व पांढरे
   3) बांबू हॅण्डल्स
   4) झाडूच्या काडया व फुलझाडू
   5) टेरीकॉट साडी
   6) कॅप, सॉक्स, आर्म बॅण्ड
   7) ब्लू सर्ज युनिफॉर्म
   8) ब्लू सर्ज कोट
   9) फलोअर वॉशिग डस्टर, हनिकेम्ब टॉवेल, टर्किश टॉवेल

2. महिला संस्था निविदेतील अटी आणि शर्ती पूर्ण करत असल्यास आणि त्यांनी उदधृत केलेले दर लघुत्तम असल्यास निविदेचे संपूर्ण अनुसूचि परिमाण त्यांना देण्यांत येईल. परंतु त्यांनी देऊ केलेले दनविदेतील लघुत्तम दरापेक्षा जास्त असल्यास, महिला संस्था निविदेतील लघुत्तम दराने पुरवठा करण्याची अट मान्य करीत असल्यास त्यांना निविदेचे 50% अनुसुचि परिमाणाकरिता कंत्राट देण्यांत येते. तथापि निविदेच्या प्रमाणित अटी आणि शर्तीमध्ये कोणतीही तडजोड केली जात नाही.

3. महापालिका आयुक्त यांची मंजुरी क्र. एमजीसी/एफ/5949 दि.13.05.1997 नुसार अंधांच्या संस्थांकरिता स्विपिंग ब्रशेसचे 50% परिणाम आरक्षित करण्यांत आलेले आहे. मात्र त्यांनी देऊ केलेले दर निविदेच्या लघुत्तम दराच्या 15% पेक्षा जास्त असता कामा नये.

**4. अनुदान/शासकिय सहाय्य क्रीयान्वित करण्याची पध्दती:**

| | |
|---|---|
| कार्यक्रम/योजनेचे नाव | कामधेनू योजना (हयात फिनेल,गणवेश,झाडुच्या काडया, डस्टर,साबण इ. चा समावेश आहे. |
| कार्यक्रमाचा कालावधी | शासन परिपत्रकाप्रमाणे |
| कार्यक्रमाची उदिद्ष्ट | गरजू तसेच आर्थिकदृष्टया दुर्बल महिलांना घरबसल्या काम देणे व त्यांना आर्थिकदृष्टया स्वावलंबी करणे. |
| कार्यक्रमाचे भौतिक आणि वित्तीय लक्ष्य | 1.गरजू तसेच आर्थिकदृष्टया दुर्बल महिलांना घरबसल्या काम देणे व त्यांना आर्थिकदृष्टया स्वावलंबी करणे.<br>2.सदर महिलांना स्वावलंबी व आर्थिकदृष्टया सक्षम करणे. |
| लाभार्थीची पात्रता | 1. महिला संस्थांनी निविदेत भाग घेणे आवश्यक आहे.<br>2. महिला संस्था सार्वजनिक विश्वस्त अधिनियम 1950 अन्वये किंवा सोसायटी रजिसट्रेशन अधिनियम 1880अन्वये नोंदणीकृत असल्या पाहिजेत.<br>3. महिला संस्थांनी नोंदणी प्रमाणपत्रांची साक्षांकित प्रत सादर करणे आवश्यक आहे.<br>4. महिला संस्थांनी मागील 3 वर्षाच्या लेखा अहवालाच्या प्रमाणित प्रती सादर करणे.<br>5. महिला संस्था महिला कल्याण कार्यक्रमात कमीत कमी 2 वर्षे कार्यरत असल्याचा पुरावा प्रमाणपत्रासहित सादर करणे आवश्यक आहे.<br>6. त्यांचे काम आणि त्यांच्या सभासदांची संख्या याबाबतची माहिती त्यांनी सादर करणे आवश्यक आहे. |
| पूर्वअपेक्षा | वरीलप्रमाणे |
| सदर कार्यक्रमाचा (योजना) फायदा कसा घ्यावा याची पध्दती | स्थानिक वृत्तपत्रांतून देण्यांत सार्वजनिक जाहिरातींना प्रतिसाद देऊन निविदेमध्ये भाग घेणे. |
| पात्रता ठरविण्याचे निकष | 1. सार्वजनिक विश्वस्त अधिनियम 1950 अन्वये किंवा सोसायटी रजिस्ट्रेशन अधिनियम 1880 |

| | |
|---|---|
| | अन्वये नोंदणीकृत महिला संस्था नामांकित छापाच्या साबणाच्या पुरवठयाकरीता खादी ग्रामोद्योग आयोगाच्या मान्यताप्राप्त मे.महिला आर्थिक विकास महामंडळ किंवा शासकीय मान्यताप्राप्त कुटिरोद्यायोग.<br>2. अंधसंस्था, अंधव्यक्ति |
| हया योजनेत दिल्या जाणा-या फायद्याचा तपशील | 1. सोपबार वॉशिंग, कार्बोलिक सोप, टॉयलेट सोप, जंतुनाशक द्रव काळे व पांढरे, बांबू हँडल्स, झाडूच्या काडया व फूलझाडू, टेरीकॉट साडी, कॅप सॉक्स, आर्म बॅण्ड, ब्लू सर्ज कोट, प-लोअर वॉशिंग डस्टर्स, हनिकोम्ब टॉवेल्स्, टर्किश टॉवेल्सच्या निविदेमध्ये 50% परिमाणांचे आरक्षण निविदेच्या अटी व शर्ती पूर्ण करण्यासापेक्ष.<br>2. अंध संस्थांकरिता स्विपिंग ब्रशच्या निविदेमध्ये 50% आरक्षित (मात्र त्यांना देऊ केलेले दर निविदेच्या लघुत्तम दराच्या 15 % पेक्षा जास्त असता कामा नये) |
| अर्थसहाय्य वितरणाची कार्यपध्दती | सक्षम अधिकारी / प्राधिका-यांच्या मंजूरीनंतर कंत्राट निविदाकारांना मंजूरीनंतर कंत्राट निविदाकारांना बहाल करण्यात येते. |
| अर्ज करण्याकरिता कोठे आणि कोणाला संपर्क साधावा | मराठी, हिंदी, गुजराती, उर्दू, इंग्रजी हया भाषेतील स्थानिक वर्तमानपत्रात सार्वजनिक जाहिरात देण्यांत येते. तसे त्या क्षेत्रातील निविदाकारांना निविदा सूचना पत्रे पाठविण्यांत येतात. अर्ज म्हणजे निविदेचे अनुसूचि प्रत आणि करारनाम्याची प्रत बृहन्मुंबई महानगरपालिका,मध्यवर्ती खरेदी प्राधिकरण, 566,ना.म.जोशीमार्ग,भायखळा,मुंबई-400 011 येथून प्राप्त करावी. |
| अर्जाकरिता शुल्क | प्रशासनानुसार शुल्क दर कायम |
| इतर शुल्क (जेथे लागू असेल तेथे) | नमुना चाचणी शुल्क (संबंधित प्रयोगशाळेने निश्चित केल्यानुसार) अधिक सदर शुल्कावर 10% प्रशासकीय आकार आकारण्यांत येतो. |